सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २०३ | बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन





श्री. रवी पाटील
पोलीस, जळगाव



श्री. अमोल पाटील
पत्रकार



श्री. स्वप्नील पारख
अमळनेर



श्री. हॅपी बग्गा
अमळनेर



श्री. ज्ञानेश्वर बागूल (माळी)
अमळनेर



श्री. प्रदीप जैन
अमळनेर



श्री. जयवंत पाटील
अमळनेर

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## महामानवाला १३५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन..!



अमळनेर : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त डॉ आंबेडकर चौकातील पुतळ्यास अभिवादन करण्यासाठी दिवसभर मोठा जनसागर लोटला होता. शहरात विविध प्रकारच्या सृजनात्मक व वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी ठिकठिकाणी जल्लोषात मिरवणुका पार पडल्या. तत्पूर्वी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सामूहिक बुद्ध वंदना झाली. यावेळी लोकप्रतिनिधी व शासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बाबासाहेबांच्या पुतळ्यास माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील, माजी आमदार डॉ. बी एस पाटील, माजी आमदार शिरीषदादा चौधरी, नगराध्यक्ष डॉ परीक्षेत बाविस्कर, प्रांताधिकारी मयूर भंगाळे, तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, पोलीस निरीक्षक दत्तात्रय निकम, मुख्याधिकारी गणेश शिंदे, माजी नगरसेवक नरेंद संदानशिव यासह आजी-माजी नगरसेवकांसह पत्रकार, सामाजिक, शैक्षणिक, शासकीय क्षेत्रातील इतर मान्यवर व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. (छायाचित्र : रजनीकांत पाटील)

# अमळनेर पालिकेत दुहेरी वाद; जिल्हा प्रशासनाकडून गंभीर दखल

## पाणीपुरवठा गैरप्रकार आणि सर्वसाधारण सभा नियमभंग प्रकरणी चौकशीचे निर्देश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः येथील नगर परिषदेत पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत गैरप्रकाराच्या आरोपांसोबतच सर्वसाधारण सभा प्रक्रियेची अनियमितता समोर आल्याने प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या दोन्ही प्रकरणांची जिल्हा प्रशासनाने गंभीर दखल घेत चौकशीचे निर्देश दिले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, पाणीपुरवठा सभापती कैलास नामदेव पाटील यांनी त्यांच्या मूळ गावी गांधली येथे तापी नदीवरील मुख्य पाईपलाईनवरून अंदाजे १ इंच व्यासाची स्वतंत्र पाईपलाईन जोडल्याचा आरोप करण्यात आला आहे. संबंधित जोडणी शेतासाठी करण्यात आल्याचे सांगितले जात असून, यासंदर्भात नगरसेवक व नगरसेविकांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार सादर केली आहे.या निवेदनावेळी आमदार अनिल भाईदास पाटील स्वतः उपस्थित होते. नगरसेविका जयश्री पाटील, स्वप्ना पाटील, शोभाबाई गढरे, योगिता कापडणे, विजय पाटील, सचिन पाटील, कविता राजपूत, देवेंद्र कांबळे, अफसाना खाटीक, जुबेदाबी नसिरुद्दीन, प्रवीण पाटील, नंदा संदानशिव, सचिन कासार, भरतकुमार ललवाणी आदींच्या सह्या निवेदनावर असल्याची माहिती आहे. तक्रारीनुसार, संबंधित कृती ही सार्वजनिक संपत्तीचा खाजगी वापर, पदाचा गैरवापर व नियमांचे उल्लंघन असल्याचे नमूद करण्यात आले



अमळनेर : जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत नगरपरिषदेच्या विषयावर सूचना मांडताना आमदार अनिलदादा पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे, पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

असून, या प्रकरणात महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ अंतर्गत अपात्र व फौजदारी कारवाईची मागणी करण्यात आली आहे.दरम्यान, नगरपरिषदेच्या जनरल मीटिंग प्रक्रियेबाबतही अनियमितता समोर आली आहे. नियमानुसार, सभेनंतर ७ दिवसांच्या आत कार्यवृत्त तयार करून ते अधिकृत संकेतस्थळावर अपलोड करणे व कार्यालयाबाहेर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. तसेच ३१ दिवसांच्या आत पुढील सभा घेणे बंधनकारक आहे. मात्र, या नियमांचे पालन न झाल्याची बाब निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर जळगाव जिल्हा प्रशासन अंतर्गत डीपीओ कार्यालयाकडून संबंधित अधिकाऱ्यांना ७ दिवसांच्या आत चौकशी अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी दिली आहे.

> *सदर विषयाबद्दल आमच्याकडे कोणीही तक्रार आलेली नाही. ती तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्यानंतर आम्हाला विषय समजला आहे. तरी याबद्दल अधिक चौकशी करू.*
> *-डॉ. परिक्षित बाविस्कर, नगराध्यक्ष*

*या संदर्भात मुख्याधिकारी गणेश शिंदे यांना दूरध्वनीद्वारे संपर्क केला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही.*



## अमळनेरसह जळगाव जिल्ह्यात पारा ४० अंशांवर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेरः राज्यातून अवकाळी पावसाने काढता पाय घेतल्यानंतर आता कडक उन्हाळ्याला सुरुवात झाली आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या ताज्या अंदाजानुसार, पुढील पाच दिवसांत राज्याच्या कमाल तापमानात मोठी वाढ होणार असून, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात उष्णतेची लाट येण्याची चिन्हे आहेत.

गेल्या आठवड्यात झालेल्या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला होता. मात्र, आता आकाश निरभ्र झाल्यामुळे सूर्याचा तडाखा वाढला आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते जळगाव, धुळे आणि विदर्भातील जिल्ह्यांत पारा ४० C ते ४२C दरम्यान पोहोचण्याची शक्यता आहे.सध्या ४० अंशांच्या आसपास असलेले तापमान येत्या ४-५ दिवसांत ५ ते ६ अंशांनी वाढण्याचा अंदाज आहे.मुंबईसह कोकण किनारपट्टीवर तापमानाचा आकडा ३८अंशांच्या आत असला तरी, तेथील नागरिकांना अधिक त्रास होणार आहे.हवेतील आर्द्रतेमुळे प्रत्यक्षात जाणवणारी उष्णता ही ४० अंशांपेक्षा जास्त भासणार आहे.वाढत्या उष्णतेमुळे 'हीट स्ट्रोक' (उष्माघात) होण्याचा धोका वाढला आहे. प्रशासनाने नागरिकांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत.दुपारी १२ ते ४ या वेळेत अत्यंत आवश्यक काम असल्याशिवाय घराबाहेर पडू नका.तहान लागलेली नसली तरीही भरपूर पाणी प्या. लिंबू सरबत, ताक आणि ओआरएसचा वापर करा. बाहेर जाताना सुती आणि फिकट रंगाचे कपडे वापरा, डोक्यावर टोपी किंवा रुमाल ठेवा.शेतातील कामे सकाळी लवकर किंवा संध्याकाळी उशिरा उरकावीत.

एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यापासून मे महिन्याच्या सुरुवातीपर्यंत हा उन्हाचा कडाका असाच कायम राहण्याची शक्यता आहे.

# निकालाआधीच ११वी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील इयत्ता अकरावीची केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया यंदा दुसऱ्या वर्षात पदार्पण करत असताना विद्यार्थी आणि पालकांच्या नजरा प्रशासनाच्या तयारीकडे लागल्या आहेत. गेल्या वर्षी संपूर्ण राज्यात पहिल्यांदाच ही प्रक्रिया राबवताना झालेल्या तांत्रिक चुका आणि गोंधळ यातून बोध घेऊन यंदा इज ऑफ लिविंग अंतर्गत सुलभतेचा दावा केला जात आहे.

गेल्या वर्षाशी तुलना केली तर यंदा सुमारे अडीच महिने आधी आणि दहावीचा निकाल जाहीर होण्याच्याही आधी प्रवेश प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. गतवर्षी दहावीच्या निकालानंतर सुरू केलेली प्रवेश प्रक्रिया तब्बल नोव्हेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सुरू होती. यंदा मात्र निकालाआधी नोंदणी सुरू केल्यामुळे निकालानंतर महिनाभरात अकरावीची ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया संपलेली असेल, असा अंदाज तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे.

मागील वर्षी ग्रामीण भागात माहिती नसल्याने पालकांनी सायबर कॅफेवर अवलंबून राहणे पसंत केले. याचा फायदा घेत अनेक चालकांनी चुकीची नोंदणी केली आणि भरमसाट शुल्क उकळले. यंदा हा प्रकार टाळण्यासाठी शिक्षण विभागाने माध्यमिक शाळांनाच मार्गदर्शन केंद्र बनवून तेथूनच अर्ज प्रमाणित करण्याचे निर्देश दिले आहेत. यंदा १० एप्रिलपासून भाग-१ भरण्यास सुरुवात झाली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांची निकालाच्या वेळी धावपळ होऊ नये. शेवटच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश होईपर्यंत सर्व प्रक्रिया गुणवत्तेनुसार केवळ ऑनलाइन चालणार आहे.गेल्या वर्षीच्या चुका टाळण्यासाठी स्वतः 11thadmission.org.in या पोर्टलचा वापर करा. त्रुटीसाठी महाविद्यालय, जिल्हा परिषदेच्या मार्गदर्शन केंद्राशी संपर्क साधा.


# अक्कलकोटमध्ये आज रंगणार पुण्यतिथी सोहळा

**श्री स्वामी समर्थ महाराज पुण्यतिथी विशेष**

## हजारो भक्त घेणार स्वामी महाराजांच्या दर्शनाची अनुभूती

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराज हे स्वामी श्री दत्तात्रयांचे तिसरे पूर्णावतार मानले जातात. हे इसवी सनाच्या १९ व्या शतकात होऊन गेले. महाराष्ट्रातील अक्कलकोट येथे स्वामींनी खूप काळ वास्तव्य केले. श्रीपाद वल्लभ व श्री नृसिंह सरस्वती यांच्यानंतरचे भगवान श्री दत्तात्रयांचे ते तिसरे पूर्णावतार अवतार असल्याचे मानले गेले आहेत. गाणगापूरचे श्री नृसिंह सरस्वती हेच नंतर श्री स्वामी समर्थांच्या रूपाने प्रकट झाले. 'मी नृसिंह भान असून श्रीशैल्यमजवळील कर्दळी वनातून आलो आहे' हे स्वामींच्या तोंडचे उद्‌गार ते नृसिंह सरस्वतींचा अवतार असल्याचे सुचवितात. विविध ठिकाणी स्वामी विविध नावांनी वावरले. स्वामी समर्थ महाराज यांची १५ एप्रिल रोजी पुण्यतिथी. यानिमित्ताने अक्कलकोटमध्ये हजारो भक्तांच्या साक्षीने हा सोहळा पार पडेल. त्यातून हजारो भक्तांना दर्शनाची अनुभूती प्राप्त होईल.



इ.स. १८५६ च्या सुमारास स्वामी समर्थ अक्कलकोटला आले. मंगळवेढ्याहून पहिल्यांदा जेव्हा ते अक्कलकोट नगरीत प्रवेशले तेव्हा त्यांनी गावातील खंडोबा मंदिरात मुक्काम केला. तो दिवस चैत्र शुद्ध द्वितीया, शके १७७८, अनल नाम संवत्सरे हा होता. सबसे बडा गुरू... गुरूसे बडा गुरू का ध्यास... और उससे भी बडे श्री स्वामी समर्थ महाराज... तसेच स्वामी महाराजांनी त्यांच्या भक्तांना अभयदान दिले. 'भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे' अशा शब्दांमधे स्वामी समर्थांची महती वर्णन केली जाते. इ.स. १४५९ मध्ये, माघ वद्य १, शके

पान २ वर

### अक्कलकोट येथे धर्मसंकीर्तन महोत्सव

अक्कलकोट येथे शुक्रवार, दि. ३ एप्रिल ते मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ दरम्यान दुपारी ४ ते सायंकाळी ७.३० या वेळेत श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानातील कै. श्री कल्याणराव इंगळे सभा मंडपात धर्मसंकीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यात दररोज भक्तीसंगीत, बाल संकीर्तन, प्रवचन भक्तीसंगीत, नारदीय कीर्तन, कथ्थक नृत्याविष्कार भक्तीसंगीत, नारदीय कीर्तन होत आहे. बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ रोजी श्री स्वामी समर्थ महाराजांची १४८ वी पुण्यतिथी तसेच चैत्र वद्य त्रयोदशी तिथी त्याचप्रमाणे बुध प्रदोष व्रतानिमित्ताने नित्य अनुष्ठान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भाविकांना दर्शन, प्रसादासह पालखी सोहळ्याचा लाभ मिळणार आहे. यावेळी वटवृक्ष समाधी मठात विशेष पूजा, अभिषेक आणि महानैवेद्य अर्पण केला जाईल. भक्तांना या दिवशी नामजप सेवा आणि सत्कर्म करून स्वामींचे आशीर्वाद घेता येतील. ज्या भाविकांना अक्कलकोटला जाणे शक्य नाही त्यांनी घरीच ब्रह्ममुहूर्तावर (पहाटे ४ वाजता) उठून स्वामींची पूजा करावी. पिवळ्या वस्त्राचा वापर करून स्वामींचा अभिषेक, ११ माळ जप आणि तारक मंत्राचे पठण करावे. नवैद्यासाठी पुरणपोळी, पिठले-भाकरी आणि पिवळा शिरा अर्पण करावा. 'भिऊ नकोस, मी तुझ्या पाठीशी आहे' या वचनाचे स्मरण करून या दिवशी नामस्मरण केल्याने मानसिक शांती मिळते आणि सर्व संकटे दूर होतात.

### आज होणारे कार्यक्रम

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६ रोजी अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मंदिरात दिवसभर विविध कार्यक्रम होतील.

* **काकड आरती :** मंदिरात पहाटे काकड आरतीने दिवसाची सुरूवात होईल.
* **विशेष पूजा :** स्वामींच्या मूर्तीवर व समाधीवर दुग्धाभिषेक होईल.
* **दुपारी आरती :** माध्यान्ह समयी (दुपारी) विशेष महाआरती व भोग अर्पण केला जाईल. * **अक्कलकोट यात्रा :** पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोटमध्ये लाखो भक्तांची गर्दी होते. या काळात वटवृक्ष मठात भक्तांसाठी राहण्याची आणि महाप्रसादाची सोय अनेक संस्थांद्वारे केलेली असल्याचे संस्थानातर्फे कळविण्यात आले आहे.

## संपादकीय

# स्वरसाम्राज्याच्या सूरसम्राज्ञी आशाताई भोसले

शब्दांमधून संवेदना व्यक्त करण्याचे काम गीतकार किंवा कवी करू शकतो. परंतु त्या शब्दांना माधुर्य आणि खरेतर शब्दांनाही अजरामर करण्याचे काम हे गायकांकडून होत असते. जगातील सर्वाधिक गाणी गाण्याचे भाग्य लाभलेल्या आणि हजारो गाण्यांना अजरामर करून सूरसम्राज्ञी म्हणून अमर ठरलेल्या आशाताई भोसले यांनी आपली इहलोकीची यात्रा संपवली आहे. आज सृष्टीमध्ये वसंत खूप बहरलेला असताना आशाताईंनी अचानकपणे अनंताकडे सुरू केलेला प्रवास अधिक चटका लावणारा ठरतो. वसंत ऋतूलाच 'ऋतू हिरवा' म्हणून ओळखले जाते आणि आशाताईंचा 'ऋतू हिरवा' हा अल्बमसुद्धा प्रचंड गाजला होता. आपल्या विविध भाषिक आणि सर्व प्रकारच्या गाण्यांमधून स्वरबहार किंबहुना सूरसम्राज्ञी म्हणूनच त्यांनी या संगीत साम्राज्याची मनोमन अनुभूती घेतली. दोन वर्षांपूर्वी लताताई गेल्या आणि पाठोपाठ आता वयाच्या ९३ व्या वर्षी आशाताईंनी घेतलेला हा निरोप म्हणजे एकूणच भारतीय संगीत क्षेत्रात निर्माण झालेल्या पोकळीत आणखीनच भर पडलेली आहे. भारतीय संगीत विश्वाची प्रभावी ओळख ज्यांच्यामुळे टिकून आहे त्या मंगेशकर कुटुंबातल्या या दुसऱ्या सदस्याचे निघून जाणे म्हणजे या तेजोमय गगन सदनातून आणखी एक तारा निखळण्यासारखे आहे. कोणतेही गाणे घेतलं की, आशाताईंच्या स्वराबरोबरच त्या गाण्यातून स्वभाव व्यक्त करण्याची अनोखी हातोटी आशाताईंकडे होती. मग ती भावगीते असतील, भक्तीगीते असतील किंवा प्रणयआधारित प्रेमगीते असतील यातून शब्दांमधले भावमाधुर्य आशाताईंच्या इतक्या प्रभावीपणे कोणीही व्यक्त करू शकलेले नाही. गाणे हे रसिकांना ऐकण्याचा आनंद देते, पण हे गाणे अधिकाधिक ऐकले जाण्याची किमया गायकाला करावी लागते. आणि त्यासाठी गाणे गाता गाताच त्याचे खूप नवीननवीन शिकणे सुरू असते. असे म्हणतात की, गाण्यांच्या विविधतेतला चमत्कार फक्त आशाताईंच्या गळ्यातूनच अनुभवता येतो. याचे कारण म्हणजे अगदी वयाच्या ९० पर्यंत त्याचे हे गाणे शिकणे आणि त्या गाण्यातून एक नवे विश्व अनुभवणे ही प्रक्रिया अखंडपणे सुरू होती.

ज्या आशाताईंनी त्यांना मिळालेल्या प्रत्येक संधीच्या क्षणांना विलक्षण करण्याची करामत करून दाखवली. मराठी भाषेचा स्वरांमधला हा साजशृंगार मराठी रसिकांना मनसोक्त अनुभवण्याची पर्वणी केवळ आशाताईंमुळे प्राप्त झाली. लताताई किंवा आशाताई यांच्यामध्ये तुलनाच होऊ शकत नाही. कारण दोघींनीही या संगीतमय दुनियेला स्वतःच्या स्वरांमधून वेगळी ओळख निर्माण करून दिली. आशाताईंचे 'धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना, शब्दरूप आले मुक्या भावनांना' म्हणजेच आपल्या स्वरांमधून खऱ्या अर्थाने मुक्या भावनांना शब्दरूप करण्याची हीच ती विलक्षण शैली आशाताईंकडे होती. वयाच्या दहाव्या वर्षी त्यांचा संगीत क्षेत्रातला प्रवेश म्हणजे 'नाच रे मोरा आंब्याच्या वनात नाच रे मोरा।' या गाण्याबरोबर ऐकणाऱ्याच्या मनालाही नाचायला लावण्याची प्रभशक्ती त्यामध्ये होती. भावगीतांमधूनसुद्धा अजी मी पाहिले, गिरीधरापुढे या नाचिन मी, जयशारदे वागिश्न देव जरी मज कधी भेटला किंवा नको रे नंदलात यासारखी गीते म्हणजे संध्यासमयी देव्हाऱ्यात मंद तेवणारा स्वरआशादीपच म्हणावा लागतो. जा बा जा सुखे सासरी, जाशील कोठे मुली तू, जीवल राहिले रे दूर घर माझे, आज कुणीतरी यावे, अ प्रीतीला पंख हे, किंवा आठवणींनो उघडा डोळे आर्त स्वरांमधून प्रेमकाव्यातली रसिकता, आगतिक किंवा विरहता, आशाताईंच्या वैविध्यपूर्ण चालींमधून अनुभवता येते. सुधीर फडके असतील, यशवंत असतील, अशा मराठीतल्या वरिष्ठ ज्येष्ठ संगीतकारांशी त्यांचे एक वेगळे नाते होते. आणि अशी अनेक गीते केवळ आशाताईच गाऊ शकतील. किंवा स्वरांना आशाताईच न्याय देऊ शकतील याची खात्री असल्याने त्यांच्याकडूनच ती गाणी पूर्ण करून घेण्याचा हट्ट या संगीतकारांचा असायचा. एकदा आशाताईंवर गाणे सोपविल की, त्याचे सोनेच होणार याची देखील त्यांना हमी वाटत असे. आणि असे तावुन सुलाख आशाताईंच्या गळ्यातून बाहेर पडणारा स्वर रसिकांच्या मनात कायमस्वरूपी घर करून राहायचा.

भारत हा सर्वाधिक लोकसंख्येचा देश आहे. याच सर्वाधिक भाषेतली सर्वाधिक गाणी गाण एकमेव स्वरराणी ठरते. आशाताईंनी कॅब्रे असेल, गझल असेल किंवा हिंदीतील सगळी प्रेमगाणी असतील. त्यातही अनेक प्रकारच्या जुगलगीतांस आशाताईंचा स्वर हा सर्वाधिक सुयोग्य स्वर मानला जात असे. थोड्या वेगळ्या शब्दांत सांगायचे तर हिंदी चित्रपटसृष्टीला आशाताईंच्या गाण्यांमुळे वेगळी लोकप्रियता मिळावी हे नाकारून चालणार नाही. वयाच्या साठाव्या वर्षानंतर त्यांनी 'जवाने जानेमन हसिन दिलरूबा', यासारखी अतिशय वेगळ्या स्वरूपाची गाणी गाऊन रसिकांना आश्चर्यचकित केले होते. ए. आर. रहेमान यांच्यासारख्या तरुण संगीतकाराबरोबर रंगीला चित्रपटासाठी, त्यांना गायिलेले रंगीला रे, या गीताने त्यांच्या स्वरांचा एक वेगळाच रंग साकार केला होता. अशा या स्वरदुनियेची वेगळीच सफर घडवून आणणारी ही गायिका कोणत्याही चौकटीत अडकलेली नाही.

# २४ वर्षांनंतर मतदार पुनर्निरीक्षण; शिवसेना सज्ज

## प्रत्येक गावात भगवा फडकवण्याचा संकल्प



*अमळनेर : आगामी निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर मतदार यादीचे विशेष सखोल पूर्णनिरिक्षण सुरू आहे. या निमित्ताने शिवसेना (शिंदे गट)च्या वतीने आमदार अमोल पाटील, माजी आमदार शिरीष चौधरी, ॲड. ललिता पाटील व कार्यकर्ते आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीचे विशेष सखोल पुनर्निरीक्षण काम चालु आहे, तब्बल २४ वर्षांनंतर निवडणुक आयोगाने हाती घेतलेले हे केवळ अभियान आपला मतदार ओळखुन त्याचे मॅपिंग करतांना संघटनात्मक बुथ प्रमुखाची खरी कसोटी लागणार आहे. मतदार यादीवर आताच लक्ष दिले तर येणाऱ्या ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद व विधानसभेची निवडणूक आपणास अवघड जाणार नाही. प्रत्येक निवडणुकीत शिवसेनेचा भगवा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही. आपला हक्काचा मतदार मतदानापासून वंचित राहु नये तसेच बोगस मतदार देखील शिल्लक राहता कामा नये यासाठी शिवसेना पक्षाच्या बीएलए ने एसआयआरच्या मैदानात उतरावे, माझा नुकताच शिवसेना पक्षात प्रवेश झाला आणि पक्षाचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथरावजी शिदे साहेब, संसद रत्न खासदार डॉ. श्रीकांतजी शिदे साहेब, जळगांव जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार गुलाबरावजी पाटील साहेब यांनी माझ्यावर नंदुरबार लोकसभा संपर्क प्रमुख पदाची जबाबदारी दिली. त्यांचा मी ऋणी आहे तसेच हे पद मला मिळाले याचे सर्व श्रेय पदाधिकारी व शिवसैनिकांचे आहे हे मी विसरणार नाही. आगामी काळात नंदुरबार लोकसभा मतदार संघ



*अमळनेर : कार्यक्रमाच्या वेळी उपस्थित शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते.*

व अमळनेर विधानसभा मतदारसंघात प्रत्येक गावा गावात शिवसेना व घरा घरात शिवसेनेचे विचार पोहोचविण्याचे काम मी केल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असे मा.आ.शिरीषदादा चौधरी यांनी सत्काराला उत्तर देतांना सागितले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पारोळा एरंडोल मतदार संघाचे आमदार श्री.अमोलदादा पाटील यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, मी अमळनेर विधानसभा मतदारसंघाचा पालक आमदार असुन शिवसेनेच्या आढावा बैठकीस उपस्थित राहीलो पण जो पर्यंत अमळनेर विधानसभा मतदारसंघावर भगवा फडकत नाही तो पर्यंत प्रत्येक कार्यक्रमास उपस्थित राहुन काम करत राहील आणि मतदारसंघातील गावे विकासापासून वंचित राहणार नाहीत यांची देखील काळजी घेऊ, संघटनेत किती ताकद असते हे नगरपरिषद निवडणुकीत सिध्द झाले आहे व बुथ प्रमुख हा पक्षाचा कणा आहे, बुथ मजबुत असेल तर निवडणुक जिंकण्यास सोपी होते म्हणुन प्रत्येक बुथ प्रमुखाने आपल्या मतदार यादीचा सखोल अभ्यास करून मतदारांची अचुक माहिती संकलित करावी असे सांगितले.

या अभियानाला अधिक परिणामकारक व मजबुत करण्यासाठी ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या आदेशाने जिल्ह्याचे पालकमंत्री ना.गुलाबरावजी पाटील साहेब यांच्या नेतृत्वात शिवसेनेकडून विधानसभाक्षेत्र निहाय आढावा बैठकीच्या माध्यमातुन प्रत्येक पदाधिकाऱ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा असे सौ. सरितताई माळी, महिला आघाडी समन्वयक यांनी मनोगतात सांगितले.प्रशिक्षण शिबिरात एसआयआर अभियानाचे महत्व, मतदार पडताळणीचे महत्व, डिजिटल मॅपिंग आणि बुथ नियोजन याबाबत ॲड. ललितताई पाटील सविस्तरपणे मांडणी करुन सांगितले.संघटनेच्या माध्यमातुन सुरु असलेले मतदार यादी पुनर्निरीक्षण कार्यक्रम प्रत्येक पदाधिकाऱ्यानी जबाबदारीने पार पाडावे व आगामी निवडणुकीच्या दृष्टीने आतापासूनच कामाला लागण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख श्री. वासुदेव पाटील यांनी केले. प्रास्ताविकात तालुका प्रमुख गुलाब पाटील यांनी एसआयआर अभियानाचे महत्व अधोरेखित करीत ज्यांना काम करायची इच्छा असेल त्यांनीच जबाबदारी घ्यावी असे सांगितले अन्यथा स्वतः हुन पदमुक्त व्हावे अशा कठोर शब्दात सांगितले. सूत्रसंचालन श्री चंद्रकांत कंखरे सर यांनी केले. कार्यकमास श्री. विष्णुभाऊ भंगाळे, (जिल्हाप्रमुख शिवसेना), श्री. रोहित कोगटा (जिल्हाप्रमुख युवासेना), सुरेश पाटील (विधानसभा क्षेत्रप्रमुख), भरत पवार (शहर प्रमुख), विलास कंखरे (शहर प्रमुख), साहेबराव दादा पवार (सभापती, बांधकाम), कैलास पाटील (सभापती, पाणीपुरवठा), नाविद शेख (सभापती, शिक्षण), महेश देशमुख (गटनेते), श्रीराम चौधरी (नगरसेवक), अबू महाजन (नगरसेवक), दिपक चौगुले (नगरसेवक), सुयोग धनगर (नगरसेवक), पांडू आप्पा भोई, बाळासाहेब संदानशिव, गुलाम नबी पठाण, गुणवंत पाटील, चित्रलेखा महाजन (महिला आघाडी), तुषार पाटील (सोशल मीडिया), मनिषा दिपक पाटील, चंद्रकांत पाटील (माजी उपसभापती, पारोळा), गोकुळ चौधरी (माजी उपसभापती, पारोळा), भैय्यासाहेब पाटील (अध्यक्ष, शेतकी संघ, पारोळा), साहेबराव पाटील (शेतकी संघ संचालक), डॉ. दिपक पाटील (माजी सभापती, अमळनेर), एन आर ठाकरे (वावडे), शशी पाटील (धार), किरण गोसावी (नगाव बु), रमेश चौधरी (कळमसरे), रावसाहेब कोळी (मांडळ), मच्छिंद्र जाधव (वसंतनगर), पंकज शेटे (विधानसभा क्षेत्रप्रमुख युवासेना),राहुल कंजर (युवासेना तालुकाप्रमुख), प्रविण पाटील (शहरप्रमुख, युवासेना) यांच्यासह असंख्य शिवसेना, युवासेना, महिला आघाडी व शिवसैनिक पदाधिकारी उपस्थित होते.

# अक्कलकोटमध्ये आज रंगणार पुण्यतिथी सोहळा

**पान १ वरून**


१३८० या दिवशी श्री नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांनी गाणगापुरास निर्गुण पादुका स्थापन केल्या व त्यानंतर शैल यात्रेचे निमित्त साधून ते कर्दळीवनात अदृश्य झाले. या कर्दळी वनात सुमारे ३०० वर्षे महाराजांनी कठोर तपश्चर्या केली. या काळात मुंग्यांनी त्यांच्यावर वारूळ रचले.

एके दिवशी उद्धव नावाचा लाकूडतोड्या त्याच कर्दळीवनात लाकडे तोडीत असताना त्याच्या हातून कुऱ्हाड निसटली व ती वारुळावर पडली. उद्धवाचे निमित्त साधून स्वामी महाराजांना पुन्हा भक्तांच्या कल्याणासाठी प्रगट व्हायचे होते. कुऱ्हाड वारुळावर पडताच त्यातून रक्ताची धार उडाली व क्षणातच दिव्य प्रकाश पडून उद्धवासमोर एक आजानुबाहू तेजस्वी मूर्ती प्रगट झाली; तेच अक्कलकोटचे स्वामी समर्थ महाराज होत. आपल्या हातून या महापुरुषाला जखम झाली, या विचाराने उद्धवाला दुःख झाले व भय वाटू लागले; पण भक्तांसाठी माताच असलेल्या महाराजांनी उद्धवाला अभय व आशीर्वाद देऊन गंगातीरी प्रयाण केले. गंगातीरावर भ्रमण करता-करता ते कोलकत्त्यास गेले व तेथे त्यांनी महाकाली मातेचे दर्शन घेतले. नंतर काशी, प्रयाग असे भ्रमण करीत ते उत्तरेकडून दक्षिणेस आले. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे त्यांनी शेगावचे श्री गजानन महाराज व शिर्डीचे श्री साई महाराज यांना दीक्षा दिली. त्यानंतर स्वामी पंढरपूर, मोहोळ असे भ्रमण करीत सोलापुरास आले. त्यानंतर मंगळवेढे नामक गावास स्वामींनी काही काळ वास्तव्य केले व तेथील भक्तांना विविध स्तरावर मार्गदर्शन केले. भेटेल त्याला आपल्या लीलेने आगळ्यावेगळ्या पद्धतींनी दुःखमुक्त करून कार्यरत केले. इसवी सन १८५६ मध्ये स्वामी महाराजांनी अक्कलकोटमध्ये प्रवेश केला व तेथील बावीस वर्षांच्या वास्तव्यात अक्कलकोट हे तीर्थक्षेत्र झाले. येथे त्यांनी जगातील अनेक मान्यवरांना मार्गदर्शन केले. स्वामींनी अनेकांना कामाला लावून इसवी सन १८७८ मध्ये त्यांचा एक आविष्कार संपविला, असे भासवले. प्रत्यक्षात स्वामी महाराज आजदेखील भक्तांच्या पाठीशी सतत राहून त्यांना मार्गदर्शन करून कार्यरत करीत आहेत व अनंतकाळपर्यंत करीत राहतील, अशी धारणा आहे. श्री स्वामी समर्थ महाराज यांनी १८७८ रोजी (चैत्र वद्य त्रयोदशी, शके १८००, बहुधान्य नाम संवत्सर) अक्कलकोट येथे 'वटवृक्ष समाधी मठ स्थानी' माध्यान्हकाली आपल्या अवतारकार्याची समाप्ती केली. नंतर श्री स्वामी समर्थ यांना त्यांचे परम शिष्य चोळप्पा यांच्या निवासस्थानाजवळ समाधिस्थ करण्यात आले. असे म्हणतात, की स्वामी महाराज पुन्हा कर्दळी वनात लुप्त झाले. हा दिवस भक्तांसाठी अत्यंत पवित्र मानला जातो. या दिवशी 'श्री स्वामी समर्थ' मंत्राचा जप करणे, तसेच अन्नदान करणे विशेष फलदायी मानले जाते.

# व्यवसाय सांभाळून विठ्ठल भक्तीचा प्रसार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

संत गोरा कुंभार हे वारकरी संप्रदायातील महाराष्ट्रातील संत होते. हे विठ्ठलाचे मोठे भक्त असून यांनी अनेक अभंग लिहिले आहे. यांचा जन्म शके ११८९ इ.स.१२६७ साली तेरढोकी पंढरपूर जवळ या ठिकाणी झाला असे मानले जाते. त्यांच्या वडिलांचे नाव माधवबुवा आणि आईचे नाव रखुमाई होते. त्यांना सर्व जण गोरोबा काका म्हणून हाक द्यायचे. तेर नगरीत गोरोबा यांचे कुटुंब धार्मिक वृत्तीचे होते. यांचे कुटुंबीय 'काळेश्वर' या ग्राम देवतांचे उपासक होते. त्यांचे आई वडील कुंभारकाम करून आपला उदरनिर्वाह करायचे. त्यांचे वडील गावात संत माधव बुवा म्हणून ओळखले जायचे. त्यांना आठ अपत्ये झाली पण दुर्दैवाने ते फार काळ जगली नाही.आपल्या आठही मुलांना त्याने दारुण हृदयाने पुरले. पण ईश्वराची किमयाच वेगळी पांडुरंग साक्षात माधवबुवांच्या घरी ब्राह्मणाचे वेष घेऊन आलेआणि त्यांना दुखी होण्याचं कारण विचारले. त्यावर माझ्या मुलांना मी माझ्या हाताने पुरले आहे आणि माझे आठही मुलं देवाने नेले. असे सांगितल्यावर पांडुरंगाने माधवबुवांना ज्या जागी मुलांचे मृतदेह पुरले आहे तेदाखवण्यास सांगितले आणि प्रेत बाहेर काढण्यास सांगितली. पांडुरंगाने सांगितल्या प्रमाणे त्यांनी प्रेत काढले आणि पांडुरंगाने त्या सात ही मुलांना जिवंत केले आणि स्वर्गात पाठवणी केली. नंतर त्यांनी आठव्या मुलाला देखील जिवंत केला आणि तो देखील स्वर्गाकडे जायला निघाला तेवढ्यात पांडुरंगाने त्यांना थांबविले आणि माधवबुवा आणि रखुमाईच्या हातात दिले आणि म्हणाले गोरीतून काढल्यामुळे ह्याचे नाव गोरोबा असेल.अशी आख्यायिका आहे. गोरोबा पेशाने कुंभार होते.संतश्रेष्ठ नामदेव व ज्ञानेश्वरांचे ते समकालीन होते,संत गोराबा हे ज्ञानेश्वर, निवृतीनाथ,मुक्ताबाई,सोपान आदि संत मंडळींमध्ये वयाने सर्वांहून वडीलधारी होते.त्यामुळे सर्व जण त्यांना गोरोबाकाका म्हणत असत.संत गोरोबांनी ज्ञानेश्वरांच्या सांगण्यावरून निवृत्तीनाथ,सोपानदेव, मुक्ताबाई,संत नामदेव,चोखामेळा,विसोबा खेचर आदि संताची,'कोणाचे मडके(डोके)किती पक्के'अशी प्रत्येकाच्या डोक्यावर मारून परीक्षा घेतली.तेव्हा संत नामदेवांना या गोष्टीचा राग आला



**संत गोरोबा काका पुण्यतिथी विशेष**

होता,त्यावेळी ज्ञानेश्वरांनी त्यांना गुरूपदेश घ्यावयास सांगितले.तेव्हा संत नामदेवांनी विठोबा खेचरांना आपले गुरू केले.संत गोरा कुंभार यांचा विवाह संतीशी झाला.त्यांना एक गोंडस बाळ झालं.नंतर त्यांनी रामी यांच्याशी लग्न केले.

संत गोरोबा सतत श्री विठ्ठलाचे स्मरण करत,भक्तिरसात ते देहभान विसरून हरवून जात.त्यांची पत्नी गोरोबांना त्यांच्या लहानग्या बाळाकडे लक्ष ठेवयास सांगून पाणी आणवयास गेली असता,श्री विठ्ठलाचे स्मरण करता करता त्यांना,लहानग्या बाळास मडकी घडविण्यासाठी लागणारी माती तुडविण्यासाठी चिखलात रांगणारे लहानगे बाळ जवळ आले आणि मातीत त्यांच्याच पायाखाली गाडले गेल्याचे समजले नाही.त्यांची पत्नी पाणी घेऊन येईपर्यत लहानगे बाळ गतप्राण झाले होते.तिच्या हंबरड्याने गोरोबांना जाग आली व ते पश्चाताप करु लागले.नंतर विठ्ठलाच्या कृपेने त्यांचे मुल जिवंत झाले.(अशी अख्यायिका सांगितली जाते.

संत गोरोबांनी शके १२३९ मध्ये १५ एप्रिल १३१७ रोजी समाधी घेतली. संत गोरोबा कुंभारांची समाधी उस्मानाबाद जिल्ह्यातील तेरढोकी गावात आहे. या समाधी जवळ एक मंदिर आहे. संत गोरोबांची उपलब्ध असलेली काव्यरचना थोडी आहे.त्यांचे सुमारे २० अभंग सकलसंत गाथेत समाविष्ट केले आहेत.त्यांची उपलब्ध असलेली काव्यरचना अत्यंत गोड अशी आहे.संत गोरोबांचे अभंग म्हणजे रसाळ वाणीचा झरा,सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत त्यांचे अभंग आहेत.निर्गुणाचा संग धरल्यावर काय अवस्था होते हे त्यांनी पुढील अभंगात सांगितले आहे.

**निर्गुणाचा संग धरिला जो आवडी ।**
**तेणें केलें देशोधडी आपणियाशी ॥१॥**
**अनेकत्व नेलें अनेकत्व नेलें ।**
**एकलें सांडिलें निरंजनीं, मायबापा ॥२॥**

# श्री मंगळग्रह मंदिर परिसरात भाविकांना मोफत ताक वाटप

## सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी जैन जागृती सेंटरचा पुढाकार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री मंगळग्रह मंदिर परिसरात आज मंगळवार, दि.१४ एप्रिल रोजी जैन जागृती सेंटर यांच्या वतीने भाविक व नागरिकांसाठी निःशुल्क मसाला ताक वाटपाचा स्तुत्य उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे त्रस्त झालेल्या नागरिकांना दिलासा देण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक करण्यात आले.मंदिरात दर्शनासाठी येणारे भाविक, प्रवासी तसेच परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. थंडगार व चविष्ट मसाला ताकाचे वाटप करण्यात आल्याने उपस्थितांना उष्णतेपासून तात्पुरता दिलासा मिळाला. अनेकांनी आयोजकांचे आभार मानत अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली.या उपक्रमाचे नियोजन जैन जागृती सेंटरचे अध्यक्ष विक्रम शहा यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी ट्रेझरर हितेशभाई शहा, सचिव यश शहा, माजी अध्यक्ष डॉ. संजय शहा, उदय शहा, कार्तिक देसाई (राज्य) तसेच गौतम पारेख यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून सेवा कार्यात सहभाग नोंदवला.




*अमळनेर : श्री मंगळग्रह मंदिरात भाविकांना ताक वाटप करताना जैन जागृती सेंटरचे पदाधिकारी.*

सर्व कार्यकर्त्यांनी शिस्तबद्ध पद्धतीने ताकाचे वितरण करत सामाजिक बांधिलकीचे उदाहरण घालून दिले. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेत समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा जैन जागृती सेंटरचा हा प्रयत्न निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com




जागतिक कलादिन विशेष

# समाजातील बदलांचे प्रतिबिंब ‘कला’

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दरवर्षी १५ एप्रिल हा दिवस जगभरात वर्ल्ड आर्ट डे म्हणून साजरा केला जातो. हा दिवस महान कलाकार Leonardo da Vinci





यांच्या जयंतीनिमित्त निवडण्यात आला आहे. कला, सर्जनशीलता आणि मानवी अभिव्यक्तीचा गौरव करण्यासाठी हा दिवस विशेष मानला जातो.

### कलेचे मानवी जीवनातील स्थान

कला ही केवळ मनोरंजनाचे साधन नाही, तर ती मानवी भावभावनांची, विचारांची आणि संस्कृतीची सखोल अभिव्यक्ती आहे. चित्रकला, शिल्पकला, संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य अशा विविध माध्यमांतून कला आपल्या आयुष्याला समृद्ध करते. कलेमुळे माणूस स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे ओळखू शकतो आणि समाजाशी सुसंवाद साधू शकतो.

### जागतिक कलादिनाचा इतिहास

२०१२ मध्ये इटरनॅशनल असोसिएशन ऑफ आर्ट या संस्थेने जागतिक कलादिनाची संकल्पना मांडली. त्यानंतर युनेस्कोनेही या दिवसाला मान्यता दिली. यामागील उद्देश म्हणजे कलेबद्दल जागरूकता वाढवणे, कलाकारांना प्रोत्साहन देणे आणि कलेच्या माध्यमातून सामाजिक एकात्मता मजबूत करणे.

### आधुनिक युगातील कलेचे बदलते स्वरूप

तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे कलेचे स्वरूपही बदलत आहे. डिजिटल आर्ट, ग्राफिक डिझाईन, ॲनिमेशन, एनएफटी आर्ट यांसारख्या नव्या प्रकारांनी कलेला नवे आयाम दिले आहेत. सोशल मीडियामुळे कलाकारांना आपली कला जगभर पोहोचवणे सोपे झाले आहे. त्यामुळे स्थानिक कलाकारांनाही जागतिक व्यासपीठ मिळत आहे.

### भारतातील कला आणि परंपरा

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्याची स्वतःची कलात्मक परंपरा आहेमधुबनी चित्रकला, वारली कला, भरतनाट्यम, कथक, लोकनृत्य, लोकसंगीत इत्यादी. या परंपरा केवळ सांस्कृतिक वारसा नसून त्या आपल्या ओळखीचा भाग आहेत. आजच्या पिढीने या कलेचा अभ्यास करून ती जपणे अत्यंत आवश्यक आहे.

### समाज आणि कलेचे नाते

कला समाजातील बदलांचे प्रतिबिंब असते. अनेकदा कलाकार आपल्या कलेतून सामाजिक प्रश्न मांडतात. गरिबी, पर्यावरण, लिंगभेद, अन्याय इत्यादी. त्यामुळे कला ही केवळ सौंदर्याचा अनुभव नसून ती समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधनही आहे. जागतिक कलादिन हा केवळ कलाकारांसाठी नसून प्रत्येकासाठी महत्त्वाचा आहे. प्रत्येकामध्ये काही ना काही सर्जनशीलता असते, ती ओळखून विकसित करणे गरजेचे आहे. या निमित्ताने आपण कलेचा सन्मान करूया, कलाकारांना प्रोत्साहन देऊया आणि आपल्या जीवनात कलेचा समावेश करून ते अधिक समृद्ध बनवूया.

# भारतातील सर्वांत लहान केंद्रशासित प्रदेश कोणता? निसर्ग सौंदर्य पाहून प्रेमात पडाल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतात आठ केंद्रशासित प्रदेश आहेत. आज आपण यातील सर्वांत छोट्या केंद्रशासित प्रदेशाची माहिती जाणून घेणार आहोत. हा भारताचा सर्वांत सुंदर भाग आहे.

### क्षेत्रफळ आणि विस्तार

लक्षद्वीप हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारतातील सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश आहे. याचे एकूण क्षेत्रफळ केवळ ३२ वर्ग किलोमीटर असून हा ३६ लहान-मोठ्या बेटांचा समूह आहे.

### भौगोलिक रचना

या द्वीपसमूहामध्ये १२ प्रवाळ बेटे, ३ रीफ्स आणि ५ जलमग्न बँक्सचा समावेश आहे. या ३६ बेटांपैकी केवळ १० बेटांवर लोकवस्ती आहे.

### राजधानी आणि प्रशासन

लक्षद्वीपची राजधानी कवरत्ती ही आहे. हा संपूर्ण केंद्रशासित प्रदेश एकच जिल्हा म्हणून ओळखला जातो आणि एका खासदाराद्वारे लोकसभेत त्याचे प्रतिनिधित्व केले जाते.

### नैसर्गिक सौंदर्य

हे ठिकाण आपल्या पांढऱ्या शुभ्र वाळूच्या समुद्रकिनाऱ्यांसाठी आणि हिरव्यागार निसर्गासाठी प्रसिद्ध आहे. हे सर्व बाजूंनी अरबी समुद्राने वेढलेले असून पर्यटनाच्या दृष्टीने अत्यंत आकर्षक आहे.

### प्रमुख भाषा आणि संस्कृती

लक्षद्वीपमधील बहुतांश लोकसंख्या मल्याळम ही भाषा बोलते. या बेटांचे सांस्कृतिक जीवन केरळ राज्याशी आणि तिथल्या परंपरांशी मिळतेजुळते आहे.

# १७ एप्रिलपासून नियम बदलणार

## एचएसआरपी प्लेट नसेल तर गाडीचे काम अडकणार, १० हजारांचा दंडही बसणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एचएसआरपी नंबर प्लेट येत्या १७ एप्रिल २०२६ पासून अनिवार्य होणार आहे. नसल्यास १० हजार रुपयांपर्यंत दंड आकारला जाऊ शकतो.

जर अजूनही गाडीला ‘हाय सिक्युरिटी नंबर प्लेट’ (एचएसआरपी) लावली नसेल, तर आता सावध होण्याची वेळ आली आहे. सरकारने या नियमाची कडक अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी १७ एप्रिलची डेडलाईन ठरविण्यात आली आहे. पुढच्या शुक्रवारपासून विना एचएसआरपी प्लेटच्या गाड्यांना १० हजार रुपयांपर्यंतचा दंड आकारला जाऊ शकतो. त्याशिवाय एचएसआरपी नंबर प्लेट नसल्यास गाडीशी संबंधित आरटीओची कामे, विम्याचे नूतनीकरण आणि कागदपत्रांची पडताळणी अशा महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळे येऊ शकतात. त्यामुळे आर्थिक दंड वाचविण्यासाठी आणि शेवटच्या क्षणाची घाई टाळण्यासाठी वेळीच नंबर प्लेट बदलून घ्या.

### एचएसआरपी नंबर प्लेटसाठी अर्ज कराच

वाहनाला अद्याप एचएसआरपी नंबर प्लेट नसेल, तर तुम्हाला मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. १७ एप्रिलनंतर ज्या वाहनांवर एचएसआरपी नंबर प्लेट नसेल अशा वाहनांना प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र दिले जाणार नाही. त्यामुळे एचएसआरपी नंबर प्लेट बसवली नाही, तर गाडीसंदर्भातील महत्त्वाची कामे रखडणार आहेत. पण या नंबरप्लेटसाठी अर्ज कसा कराल. एचएसआरपी नंबर प्लेट https://transport.maharashtra.gov.in/ZoneWiseWebsit-eRedirect.html यावर ऑनलाइन ऑर्डर करू शकता. आपल्या वाहनाचा तपशील भरावा लागेल. वाहनाला एचएसआरपी बसविण्यासाठी आपल्याला एक तारीख आणि वेळ कळविली जाईल.

### एचएसआरपी महत्त्वाची का ?

हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट म्हणजेच एचएसआरपी ही सुरक्षेचा विचार करून तयार केलेली विशेष नंबर प्लेट आहे. त्यामध्ये विशिष्ट कोड आणि होलोग्राम असतात. या नंबरप्लेटमुळे प्रत्येक वाहन सहज ओळखता येते. बनावट नंबर प्लेट्स आणि चोरी यांसारख्या घटना टाळण्यास या नंबर प्लेटमुळे मदत होते. त्यामुळे सरकारकडून एचएसआरपी नंबर प्लेट अनिवार्य केली आहे. आतापर्यंत अनेकांनी ही नंबरप्लेट बसवली आहे.



पण काही जणांनी अद्याप नंबर प्लेट बसवली नाही. त्यांना १७ एप्रिलनंतर मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो.

### एचएसआरपी नंबर प्लेट नसल्यास किती बसणार दंड?

वाहनाचे पीयूसीसी प्रमाणपत्र नसेल तर मोटार वाहन कायद्यांतर्गत उत्तर प्रदेशमध्ये पहिल्या उल्लंघनासाठी एक हजार रुपयांचा दंड आकारला जातो. तर पुन्हा तीच चूक केली तर २ हजारांचा दंड. त्याशिवाय वारंवार हीच चूक होत असेल तर १० हजारांचा दंड आकारला जातो.

जर वाहनाला पीयूसीसी किंवा एचएसआरपी नंबर प्लेट नसेल तर दोन्हींसाठी स्वतंत्र चलन दिले जाऊ शकते. ज्यामुळे जास्त दंड आकारला जाऊ शकतो. एचएसआरपी चलनाचा दंड ५ हजारांपर्यंत असू शकतो.

# वैभव सूर्यवंशी आपल्याच संघावर नाराज!

## आयपीएल २०२६ : राजस्थान रॉयल्सचा ‘तो’ निर्णय पटेना

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयपीएल २०२६ चा हंगाम आतापर्यंत राजस्थान रॉयल्सचा आघाडीचा फलंदाज वैभव सूर्यवंशीने गाजवला आहे. मात्र सध्या तो आपल्याच संघावर नाराज असल्याचे समजत आहे.

आयपीएल २०२६ चा हंगाम आतापर्यंत राजस्थान रॉयल्सचा आघाडीचा फलंदाज वैभव सूर्यवंशीने गाजवला आहे. सूर्यवंशीने सर्वच संघांच्या दिग्गज गोलंदाजांची धुलाई केली आहे. मात्र, राजस्थान रॉयल्सने सलग दोन सामन्यांत त्याला बेंचवर बसविल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. प्रथम क्षेत्ररक्षण करताना संघ व्यवस्थापनाने १५ वर्षीय खेळाडूला इम्पॅक्ट प्लेअर म्हणून खेळविले. म्हणजे या सामन्यांमध्ये वैभव सूर्यवंशीने फक्त फलंदाजी केली. संघाने त्याला क्षेत्ररक्षण करण्याची संधीच दिली नाही. राजस्थानच्या या निर्णयामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यातच आता वैभव सूर्यवंशीही संघाच्या या निर्णयावर नाराज असल्याचे समजत आहे.

गुवाहाटीत बेंगळुरूविरोधातील सामन्यात सर्वांत आधी त्याला बेंचवर बसविण्यात आले. या सामन्यात त्याने २६ चेंडूत ७८ धावा केल्या. यानंतर सोमवार, दि. १३ एप्रिल रोजी हैदराबादविरोधातील सामन्यात त्याला बसविण्यात आले.

राजस्थान रॉयल्सचे सहाय्यक प्रशिक्षक ट्रेव्हर पेनी यांना यासंदर्भात विचारले असता त्यांनी वैभव सूर्यवंशीलाही हा निर्णय फारसा पटला नसल्याचे सांगितले आहे. त्याला क्षेत्ररक्षण करायला मनापासून आवडते आणि मैदानात उतरून संघासाठी आपले सर्वस्व पणाला लावण्याची त्याची तीव्र इच्छा आहे असे त्यांनी सांगितले.



सुरूवातीच्या काही सामन्यांमध्ये सूर्यवंशीला बाकावर बसवण्याचा निर्णय घेण्यात आला नव्हता; कारण त्यावेळी डोनोव्हन फरेरा दुखापतीतून सावरत होता. आता फरेरा पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यामुळे वैभवला ‘इम्पॅक्ट प्लेयर’ म्हणून मैदानात उतरवण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरला नव्हता, असेही त्यांनी सांगितले.

‘मागच्या सामन्यात तो खेळू शकला नसल्याने फार दुःखी होता. त्याला क्षेत्ररक्षण करायला आवडते. तो खराब क्षेत्ररक्षण करतो असे नाही,’ असे त्यांनी सामन्यादरम्यान सांगितले.

ते म्हणाले, की ‘डोनोव्हनने फिटनेस टेस्ट उत्तीर्ण केली आहे. एसए २० स्पर्धेदरम्यान त्याच्या मानेचे हाड मोडले होते. तो एक जबरदस्त क्षेत्ररक्षक आहे. त्याला पुन्हा मैदानावर परत आलेले पाहून आनंद होत आहे. दुर्दैवाने वैभवला मात्र याला मुकावे लागत आहे’.

# आयएएस अफसर बनने के लिए एमबीबीएस डॉक्टर ने छोड़ दी डॉक्टरी

सक्सेस स्टोरी

## शीशे को बनाया था यूपीएससी इंटरव्यू का साथी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

‘जब सपने पूरे करने के लिए आवाजा भीतर से आती है तो रास्ते खुद बन जाते हैं।’ यह लाइन सटीक बैठती है रोहतक की बेटी अपराजिता सिंह पर। उन्होंने मेडिकल करियर छोड़कर सिविल सेवा की राह चुनी थी। एमबीबीएस की डिग्री हासिल करने के बाद डॉक्टरी करते-करते उन्होंने आयएएस बनने का फैसला किया। पहले प्रयास में असफलता के बाद भी डटी रहीं। इंटरव्यू की तैयारी के लिए शीशे को अपना सबसे साथी बनाया और दूसरे प्रयास में यूपीएससी क्रैक कर अफसर बनीं। आइए इस सक्सेस स्टोरी में जानते हैं उनकी संघर्ष की यात्रा, जो यह दिखाती है कि सच्ची लगन से कुछ भी असंभव नहीं है।

### डॉक्टर परिवार से तय किया आयएएस तक का सफर

अपराजिता सिंह एक इंटरव्यू में बताती हैं कि उनका जन्म डॉक्टर परिवार में हुआ था। उनके माता-पिता और दोनों भाई मेडिकल प्रोफेशन से जुड़े हैं। ऐसे माहौल में पली-बढ़ीं डॉक्टर बनना आसान रास्ता था और वह उस रास्ते पर बढ़ी भीं लेकिन फिर उन्होंने डॉक्टरी छोड़कर सिविल सेवा को चुना था।

### नाना-नानी के घर से पढ़ाई, रोहतक से एमबीबीएस की डिग्री

अपराजिता ने हरियाणा के रोहतक में अपने नाना-नानी के घर रहकर पढ़ाई पूरी की है। उन्होंने पोस्ट ग्रेजुएट इंस्टीट्यूट ऑफ मेडिकल साइंसेज से एमबीबीएस की डिग्री हासिल की। साधारण माहौल में पढ़ाई करते हुए उन्होंने अपने लक्ष्य को स्पष्ट रखा। स्कूल के दिनों में अपराजिता की हैंडराइटिंग काफी खराब थी, जिससे उन्हें कई बार परेशानी उठानी पड़ी।



### आयएएस का सपना, डॉक्टरी छोड़कर सिविल सेवा की तैयारी

मेडिकल की पढ़ाई के बाद डॉक्टर की प्रैक्टिस करने लगी थीं। ८ घंटे की ड्यूटी करते-करते उन्होंने आयएएस बनने का सपना देखा था क्योंकि वह समाज के लिए और ज्यादा करना चाहती थीं। इसलिए उन्होंने डॉक्टरी छोड़कर सिविल सेवा की तैयारी शुरू कर दी। लगातार सुधार और मेहनत से उन्होंने खुद को बेहतर बनाया, जो उनकी सफलता का अहम हिस्सा बना।

### यूपीएससी के दूसरे प्रयास में हासिल की सफलता, बनीं अफसर

२०१७ में उन्होंने परीक्षा पहली बार थी लेकिन उन्हें असफलता मिली। इसके बाद उन्होंने परीक्षा की यूपीएससी की तैयारी में कई इंप्रूवमेंट किए। साल २०१८ में अपने दूसरे प्रयास में उन्होंने यूपीएससी परीक्षा पास की। इस बार ऑल इंडिया रैंक ८२ लाकर आयएएस अफसर बनने का सपना पूरा किया। उनकी सफलता लगातार मेहनत और धैर्य का नतीजा है, जिसने उन्हें लाखों युवाओं के लिए प्रेरणा बना दिया।

### इंटरव्यू की तैयारी में शीशे के सामने अभ्यास का रोल

यूपीएससी इंटरव्यू में बेहतर प्रदर्शन के लिए अपराजिता ने शीशे के सामने अभ्यास (मिरर प्रैक्टिस) को महत्वूर्ण बताया। उनका कहना है कि अगर शीशे के सामने बैठकर प्रैक्टिस करें तो तैयारी में यह सबसे बड़ा साथी हो सकता है। घर में लंबे शीशे के सामने बैठकर बोलने से एक्सप्रेशन और बॉडी लैंग्वेज को सुधारने में मदद मिलती है। उन्हें भी इससे आत्मविश्वास मिला और इंटरव्यू में उन्हें २०१ अंक मिले थे।

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी




एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम

सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# चैत्र अमावास्येला काय उपाय कराल?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

चैत्र अमावास्या तिथीची सुरूवात १६ एप्रिल, गुरुवार रात्री ०८.११ वाजता. अमावास्या तिथीची समाप्ती १७ एप्रिल २०२६, शुक्रवार सायंकाळी ०५.२२ पर्यंत आहे. चैत्र महिन्यातील अमावास्या पितरांच्या शांतीसाठी विशेष मानली जाते. त्याला 'दर्शन अमावास्या' किंवा काही ठिकाणी 'भूतदी अमावास्या' असेही म्हणतात. जेव्हा नकारात्मक शक्तींचा नाश करण्यासाठी भगवान हनुमानजींची पूजा करण्याचा विधी असतो.

सकाळी लवकर उठून तीर्थस्थानी स्नान करावे किंवा पाण्यात गंगाजल टाकून स्नान करावे. गरजू लोकांना अन्न, वस्त्र, काळे तीळ आणि छत्रीचे दान करा.

- यामुळे पितृदोष कमी होतो.
- दुपारी पिंपळाच्या झाडाला पाणी अर्पण करा आणि पितरांचे स्मरण करा.
- पितरांच्या आत्म्याच्या शांततेसाठी तर्पण आणि 'पिंडदान' (श्राद्ध) करा.
- सायंकाळी पिंपळाच्या झाडाखाली मोहरीच्या तेलाचा दिवा लावा. हे शनी देव आणि पितरांना प्रसन्न करण्यासाठी उत्तम मानले जाते.
- भगवान विष्णू आणि शिव शंकराची (शिवलिंगावर पाणी अर्पण करून) पूजा करा. यामुळे जीवनातील संकटे दूर होतात.
- गायीला तांदूळ आणि गूळ भरवा. तसेच कावळे, कुत्रे आणि गरजूंना अन्न द्या.
- १०८ वेळा गायत्री मंत्राचा जप करा आणि घराच्या ईशान्य कोपऱ्यात दिवा लावा.

# अक्षय्य तृतीया १९ एप्रिलला कशी साजरी कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अक्षय्य म्हणजे कधीही क्षय न पावणारी. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेचा दिवस विशेष महत्त्वाचा मानला जातो. वैशाख शुक्ल द्वितीयाला अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. यंदा १९ एप्रिल रोजी अक्षय्य तृतीया आहे. या दिवशी अन्नपूर्णा जयंती, नर-नारायण जयंती, परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती आणि हयग्रीव जयंती असते, असे सांगितले जाते.

अक्षय्य तृतीयेला लक्ष्मी देवी आणि श्रीविष्णूंचे विशेष पूजन केले जाते. त्यावेळी काही उपाय केल्यास लक्ष्मी देवीचे शुभाशीर्वाद, सुख-समृद्धी, यश-प्रगती, पद-पैसा-प्रतिष्ठा यांची प्राप्ती होऊ शकते. वैभव-भरभराट मिळू शकते, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. या दिवशी सुरू केलेल्या कोणत्याही शुभ कार्याचे फळ 'अक्षय्य' म्हणजेच न संपणारे असे मिळते, असा समज आहे. साडेतीन मुहूर्तपैकी एक असल्याने या दिवशी नवीन घरात प्रवेश, नवीन वस्तू घेणे, मोठे आर्थिक व्यवहार करणे आदी शुभ कामेही केली जातात. अक्षय्य तृतीयेला लक्ष्मी प्राप्तीसाठी काही विशेष उपाय सांगण्यात आले आहेत. याने अनेकविध फायदा मिळू शकतात, असे म्हटले जात आहे.

अक्षय्य तृतीयेला श्रीविष्णू आणि लक्ष्मी देवीची विधिवत पूजा करावी. या दिवशी पिवळे वस्त्र परिधान करून श्रीविष्णूंची षोडषोपचार पूजा करावी. देवी लक्ष्मीला पांढरी व गुलाबी फुले अर्पण करावीत. शक्य असेल तर कमळाचे फूल अर्पण करावे. श्रीविष्णू आणि लक्ष्मी देवी यांना आवडत्या पदार्थांचा नैवेद्य दाखवावा. तसेच आवडत्या वस्तू अर्पण कराव्यात. नामस्मरण करावे. मनापासून प्रार्थना करावी.



अक्षय्य तृतीयेला दान अवश्य करा. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पितरांच्या नावाने दान व तर्पण अर्पण करणे. या दिवशी पितरांच्या नावाने श्राद्ध करता आले तर त्याचे विशेष महत्त्व असून, पितरांच्या नावाने दान केल्यास शाश्वत फळ मिळते, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते. असे केल्याने पितरांचा आशीर्वाद मिळू शकतो, असे म्हणतात. या दिवशी केलेले दान अक्षय्य होते, असे भविष्यपुराणात आलेले आहे.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी ११ कवड्यांची माळ करून लाल कपड्यात बांधून पूजेच्या ठिकाणी ठेवावी. या दिवशी देवी लक्ष्मीची विधिवत पूजा करावी. ११ कवड्यांची माळ देवीला अर्पण करावी. त्यानंतर कपाट किंवा तिजोरीसारख्या संपत्तीच्या ठिकाणी ठेवावी. असे केल्याने देवी लक्ष्मीची कृपा होते आणि धनात चांगली वाढ होऊ शकते, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी सकाळी घरातील प्रवेशद्वाराच्या चौकटीवर हळदयुक्त पाणी शिंपडावे. केशर आणि हळद लक्ष्मी पूजनात अर्पण करावे. खीर अर्पण करावी. असे केल्याने आर्थिक समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसू शकतो.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पूजेच्या ठिकाणी लाल कापडात नारळ बांधून ठेवा, नंतर विधिवत पूजा करा. पूजा केल्यानंतर नारळ कपाट किंवा तिजोरीसारख्या संपत्तीच्या ठिकाणी ठेवा. असे केल्याने संपत्तीत चांगली वाढ होऊ शकेल. अडकलेला पैसा परत मिळू शकतो, अशी मान्यता असल्याचे सांगितले जाते.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी श्रीविष्णूंचे सहस्त्रनाम आणि श्रीसूक्ताचे पठण अवश्य करावे. ही दोन्ही स्तोत्रे म्हणणे शक्य नसेल, तर मग श्रवण करावे. लक्ष्मी देवी तसेच श्रीविष्णूंच्या मंत्रांचा जप करावा. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी महाराष्ट्रात काही ठिकाणी रामरक्षा स्तोत्राचे पठण या दिवशी चरितमानसच्या अरण्यकांडाचे पठण करणे अत्यंत शुभमानले जाते. पठण शक्य नसेल तर श्रवण नक्की करावे.



# शंभर वर्षांपासूनचा इतिहास आणि मानाच्या काठ्यांची परंपरा

## रायगडमधील रायबा देवीची भव्य यात्रा; 'या' दिवशी साजरा होणार उत्सव

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रायगड भूमी ही देवदेवतांच्या जागृत स्थानांनी आणि समृद्ध लोकपरंपरेने नटलेली आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील रावे गावात असलेल्या 'रायबा देवी' या ग्रामदेवतेचा इतिहास आणि तिची यात्रा संपूर्ण जिल्ह्यासाठी आकर्षणाचे केंद्र असते. तब्बल १०० वर्षांहून अधिक काळ जोपासलेली ही परंपरा आजही तितक्याच उत्साहात आणि श्रद्धेने साजरी केली जाते. यंदा १७ एप्रिल २०२६ रोजी रायबा देवीचा भव्य यात्रा उत्सव साजरा होणार असून, या उत्सवासाठी ग्रामस्थांनी जय्यत तयारी सुरू केली आहे.

### १०० वर्षांचा इतिहास आणि रायबा देवीचे स्वरूप

रायबा देवीला रायगडमधील एक अत्यंत जागृत आणि नवसाला पावणारी देवी मानले जाते. या मंदिराचा इतिहास १०० वर्षांहून जुना असून, या देवीच्या नावावरूनच परिसरातील अनेक गावांना आणि समाजाला एक वेगळी ओळख मिळाली आहे. १७ एप्रिल रोजी चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षाच्या उत्तरार्धात ही यात्रा भरते. असे मानले जाते, की देवी रायबा ही केवळ एका गावाची नसून संपूर्ण परिसराचे रक्षण करणारी 'आई' आहे. या दिवशी देवीला सोन्या-चांदीच्या दागिन्यांनी मढवले जाते आणि तिचे दर्शन घेण्यासाठी रायगडसह ठाणे, मुंबई, रत्नागिरीसह उर्वरित महाराष्ट्रातून भाविक मोठ्या संख्येने येतात.

### मानाच्या काठ्यांची अनोखी परंपरा

रायबा देवीच्या यात्रेचे सर्वांत मुख्य आकर्षण म्हणजे 'मानाच्या काठ्या'. कोकणातील अनेक यात्रांमध्ये काठ्यांची परंपरा असली, तरी रायबा देवीच्या यात्रेत या काठ्यांना विशेष धार्मिक अधिष्ठान आहे. या काठ्या म्हणजे देवीच्या विविध उप-देवतांचे किंवा रक्षक देवतांचे प्रतीक मानल्या जातात. या यात्रेसाठी ठराविक घराण्यांकडे या काठ्यांचे मानपान पिढ्यानपिढ्या चालत आले आहेत. १७ एप्रिलच्या दुपारी ढोल-ताशांच्या गजरात आणि पालखी सोहळ्यात या उंच काठ्या नाचवल्या जातात. या काठ्यांच्या दर्शनासाठी भाविक गर्दी करतात आणि त्यावर गुलाल उधळून आपला आनंद व्यक्त करतात. ही दृश्ये डोळ्यांचे पारणे फेडणारी असतात.

### सामुदायिक उत्सव आणि सांस्कृतिक महत्त्व

ही यात्रा केवळ धार्मिक सोहळा नसून तो एक सामाजिक मेळावा देखील आहे. १७ एप्रिलच्या रात्री देवीचा गोंधळ, पालखी सोहळा आणि स्थानिक कलाकारांचे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. यात्रेच्या दिवशी भाविक देवीला नैवेद्य म्हणून गोडधोड अर्पण करतात आणि आपापल्या नातेवाईकांना घरी बोलावून आनंद साजरा करतात.

# तेल-तुपाशिवाय पेटतोय शेकडो वर्षांपासून दिवा

## जवळ समुद्र नसतानाही या मंदिरात ऐकू येतो लाटांचा आवाज; हे कसे काय?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताला प्राचीन मंदिरांचा आणि गूढ रहस्यांचा देश मानले जाते. अशी अनेक मंदिरे आहेत जेथे विज्ञानाचे नियम देखील फिके पडतात. दक्षिण भारतातील आंध्र प्रदेशात स्थित असे एक मंदिर आहे जे केवळ त्याच्या श्रीमंतीसाठीच नाही, तर तेथे घडणाऱ्या अद्भुत चमत्कारांसाठी जगभरात प्रसिद्ध आहे. या मंदिरात अशा काही घटना घडतात ज्या आजही आधुनिक विज्ञानासाठी एक मोठे कोडे आहेत. आजच्या काळात जेथे जग तंत्रज्ञानाच्या शिखरावर आहे. तेथे या मंदिरावरील श्रद्धा आणि रहस्ये पर्यटकांना व भक्तांना थक्क करून सोडतात.

### मूर्तीला येतो घाम आणि शरीराचे तापमान

तिरुपती बालाजी मंदिरात भगवान व्यंकटेश्वराची मूर्ती साक्षात जीवंत असल्याचे मानले जाते. यामागचे सर्वांत मोठे कारण म्हणजे या मूर्तीचे तापमान. सामान्यतः दगडाच्या मूर्ती थंड असतात. परंतु तिरुपतीमधील मुख्य मूर्तीचे तापमान नेहमी ११० अंश फॅरेनहाइट (सुमारे ४३ अंश सेल्सिअस) इतके असते. मंदिरात कितीही थंडी असली किंवा मूर्तीवर थंड पाण्याचा अभिषेक केला, तरी मूर्तीचे तापमान कमी होत नाही. विशेष म्हणजे पूजेच्या वेळी मूर्तीला चक्क घाम येतो. हा घाम पुसण्यासाठी रेशमी कापडाचा वापर केला जातो. जेव्हा पुजारी मूर्तीला स्पर्श करतात, तेव्हा ती एखाद्या जीवंत मानवी शरीराप्रमाणे उबदार लागते, असे सांगितले जाते.



### तेल आणि तुपाशिवाय जळणारा अखंड दिवा

मंदिराच्या गाभाऱ्यात एक दिवा आहे जो गेल्या शेकडो वर्षांपासून सतत प्रज्वलित आहे. या दिव्याचे सर्वात मोठे रहस्य म्हणजे यात तेल किंवा तूप कधीही टाकले जात नाही. तरीही हा दिवा कधीही विझत नाही. हा दिवा नेमका कधी लावला आणि तो कशाच्या आधारावर जळतो आहे, याचे उत्तर आजही कोणाकडे नाही. अनेक इतिहासकारांनी आणि संशोधकांनी यावर अभ्यास करण्याचा प्रयत्न केला, परंतु या दिव्यामागील ऊर्जा स्त्रोत शोधण्यात यश आले नाही. भाविकांच्या मते, हा साक्षात ईश्वरी प्रकाश आहे जो अनंत काळापासून मंदिराचे रक्षण करत आहे.

# हजारो वर्षे लोटली तरी उलगडले नाही रहस्य

## असे मंदिर ज्याची कडक उन्हातही गायब होते सावली!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात अशी अनेक मंदिरे आहेत, की जी त्यांच्या रहस्यांसाठी जगप्रसिद्ध आहेत. भारताला ऐतिहासिक वारसा लाभला आहे. जो भारतातील वेगळेपण दर्शवितो. भारतात असेही एक प्राचीन मंदिर आहे जे त्याच्या भव्य वास्तू आणि रेखीव कोरीव कामासाठी देखील प्रसिद्ध आहे.

भारतातील सर्वांत प्राचीन आणि रहस्यमय मंदिरांपैकी एक असलेले हे मंदिर. संपूर्ण ग्रॅनाइटपासून बनलेले आहे आणि सुंदर कोरीवकाम असलेल्या उंच भिंतींनी वेढलेले आहे. या मंदिराचे सर्वात मोठे रहस्य म्हणजे त्याची सावली जमिनीवर पडत नाही. हे रहस्य कोणीही उलगडू शकलेले नाही.



तमिळनाडूच्या तंजावर येथील बृहदीश्वर मंदिर हे केवळ भारताचेच नव्हे तर संपूर्ण जगातील एक वास्तुशिल्पीय आश्चर्य मानले जाते. १००० वर्षांहून अधिक काळ लोटला तरी या मंदिराचे तंत्रज्ञान आजही आधुनिक अभियंत्यांना कोड्यात टाकते. बृहदेश्वर मंदिराला त्याच्या भव्य वास्तुकला, धार्मिक महत्त्व आणि सांस्कृतिक सौंदर्यामुळे युनेस्कोने जागतिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे.

हे मंदिर भगवान शिव यांना समर्पित आहे आणि भारतातील सर्वांत मोठ्या शिव मंदिरांपैकी एक मानले जाते. त्याच्या गर्भगृहात एक मोठे शिवलिंग आहे. पण याशिवाय हे मंदिर स्वतःमध्येच एक मोठे रहस्य आहे. एक असे रहस्य जे आजपर्यंत विज्ञानालाही सोडवता आलेले नाही.

या मंदिराबाबतचे सर्वांत मोठे आणि चर्चित रहस्य म्हणजे 'दुपारच्या वेळी या मंदिराच्या मुख्य शिखराची सावली जमिनीवर पडत नाही.' चोल राजा राजराजा प्रथम यांनी बांधलेले हे मंदिर पूर्णपणे ग्रॅनाईट दगडांनी बनलेले आहे. विशेष म्हणजे या भागात कुठेही ग्रॅनाईटचे डोंगर नसताना इतके अजस्त्र दगड येथे कसे आणले, हे एक मोठे गूढ आहे.

दुपारी जेव्हा सूर्य बरोबर डोक्यावर असतो, तेव्हा या मंदिराच्या मुख्य गोपुराची सावली जमिनीवर कुठेही पडताना दिसत नाही. अनेकांच्या मते हे वास्तूरचनेचे असे कौशल्य आहे की सावली स्वतःच्याच पायाशी लुप्त होते. मात्र, विज्ञानाच्या दृष्टीने पाहिले तर मंदिराचे शिखर इतके भव्य आणि विशिष्ट कोनात बांधले आहे, की त्याची सावली जमिनीवर न पडता मंदिराच्याच पायथ्याशी विरून जाते, ज्यामुळे ती 'गायब' झाल्याचा भास होतो.

मंदिराच्या बुरुजाची रचना अशा प्रकारे केली आहे, की दुपारी त्याची सावली जमिनीवर पडत नाही. हे शास्त्रज्ञ आणि भक्तांना अजूनही गोंधळात टाकत आहे. शास्त्रज्ञांना अद्याप हे रहस्य उलगडलेले नाही. असे म्हटले जाते, की मंदिराची रचना अशा प्रकारे केली आहे की त्याची सावली जमिनीवर पोहोचत नाही.

# भारतातील एक अनोखे भगवान शिव मंदिर

## जेथे आहेत तब्बल एक कोटी शिवलिंग; नेमके काय आहे कारण?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताला मंदिरांचा देश म्हटले जाते. जेथे प्रत्येक कोपऱ्यात श्रद्धेची नवनवीन रूपे पाहायला मिळतात. दक्षिण भारतातील कर्नाटक राज्यातील कोळार जिल्ह्यात असेच एक अद्भुत मंदिर आहे, ज्याचे नाव ऐकताच भाविक थक्क होतात. हे आहे 'कोटिलिंगेश्वर मंदिर'. या मंदिराचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथे चक्क एक कोटी शिवलिंगांची स्थापना करण्यात आली आहे. कोटिलिंगेश्वर म्हणजे कोटी. कर्नाटकात असलेले हे कोटिलिंगेश्वर मंदिर येथील विशाल शिवलिंग आणि नंदीमुळेही ओळखले जाते. म्हणूनच याला सर्वांत उंच शिवलिंग असलेले मंदिर म्हणून ओळखले जाते.

### मंदिराची स्थापना आणि एक कोटी शिवलिंगांचा संकल्प

कोटिलिंगेश्वर मंदिराची स्थापना १९८० मध्ये स्वामी संभा शिवमूर्ती यांनी केली होती. या मंदिराच्या निर्मितीमागे एक भव्य संकल्प होता तो म्हणजे एकाच ठिकाणी एक कोटी शिवलिंगांची स्थापना करणे. सध्या या मंदिर परिसरात सुमारे एक कोटी छोटी-मोठी शिवलिंगे स्थापित करण्यात आली आहेत. येथे येणारा प्रत्येक भक्त आपल्या श्रद्धेनुसार आणि नवसानुसार तेथे नवीन शिवलिंगाची स्थापना करू शकतो. यामुळेच गेल्या चार दशकांपासून या शिवलिंगांची संख्या वाढत आहे.

### जगातील सर्वांत उंच शिवलिंग आणि नंदी

या मंदिराचे दुसरे मोठे आकर्षण म्हणजे येथील मुख्य शिवलिंग. हे जगातील सर्वात उंच शिवलिंगांपैकी एक मानले जाते, ज्याची उंची सुमारे १०८ फूट आहे. या महाकाय शिवलिंगाच्या समोरच प्रभू शिवाचे वाहन असलेल्या नंदीची एक भव्य मूर्ती आहे, जी साधारण ३५ फूट उंच आहे. हे दृश्य इतके भव्य आहे की लांबूनही भाविकांना या शिवलिंगाचे दर्शन घेता येते. मुख्य शिवलिंगाच्या भोवती चारी बाजूंना लाखो छोटी शिवलिंगे अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मांडलेली आहेत, जी पाहताना मनाला एक वेगळीच शांतता आणि शक्ती मिळते.



### धार्मिक महत्त्व आणि शिवलिंग स्थापनेचे कारण

असे मानले जाते, की या ठिकाणी शिवलिंगाची स्थापना केल्याने भक्ताच्या सात पिढ्यांचे पाप धुऊन निघतात आणि त्याला मोक्षप्राप्ती होते. अनेक भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी किंवा कुटुंबाच्या कल्याणासाठी येथे शिवलिंग दान करतात.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)